# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

## दिनांकः09.07.2025 वारःबुधवार

---

1) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ब्राझिल भेटीत महत्वाचे करार, शेवटच्या टप्प्यात पंतप्रधानांची आज नामीबिया भेट

2) घटना दुरुस्ती करून राज्य घटनेच्या मूळ गाभ्याला धक्का लावता येत नाही-सरन्यायाधीशांचं प्रतिपादन

3) बालकांसाठीच्या जगातल्या पहिल्या हिवताप विरोधी उपचार पद्धतीच्या वापराला मान्यता

4 ) महाराष्ट्रातील सहा औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचं आधुनिकीकरण करण्यासाठी परदेशी पतसंस्थांद्वारे १२० कोटींची गुंतवणूक

5 ) महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यात मुसळधार पाऊस, जनजीवन विस्कळीत

**पंतप्रधान**

ब्राझिलच्या दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल ब्राझीलचे अध्यक्ष लुईझ इनासियो लुला दा सिल्वा यांच्यासोबत प्रतिनिधीमंडळ स्तरावरील चर्चा केली. व्यापार, संरक्षण, ऊर्जा, अंतराळ, तंत्रज्ञान, शेती, आरोग्य आणि परस्पर संबंध याविषयी दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारी वाढविण्यावर या चर्चेत भर देण्यात आला. यावेळी परस्पर हिताच्या तीन महत्वाच्या करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. मोदी यांना ब्राझिलचा 'ग्रँड कॉलर ऑफ द नॅशनल ऑर्डर ऑफ द सदर्न क्रॉस' हा सर्वोच्च सन्मान ब्राझीलच्या अध्यक्षांनी प्रदान केला.

दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात, पंतप्रधान आज नामिबियाला भेट देणार आहेत. नामिबियाचे अध्यक्ष नेतुम्बो नंदी-नदैतवाह यांच्याशी पंतप्रधान द्विपक्षीय चर्चा करतील. नामिबियाच्या संसदेत ते उपस्थितांना संबोधित करणार आहेत. या भेटीदरम्यान, पंतप्रधान मोदींना नामिबियाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. मोदी यांची ही पहिलीच नामिबिया भेट आगामी भारत-आफ्रिका यांच्यातील शिखर परिषद आणि जागतिक दक्षिण प्राधान्यक्रमासाठी विशेष महत्वाची आहे. ऐकू या याविषयीचा हा वृत्तांत

**V/C स्क्रिप्ट ---**

आफ्रिका खंड भारताच्या परराष्ट्र धोरणाचे केंद्र बनत असताना, पंतप्रधानांचा नामिबिया दौरा महत्वपूर्ण आहे . नामिबियामध्ये खनिजांचे प्रचंड साठे आहेत जे भारताच्या स्वच्छ ऊर्जा संक्रमणासाठी आणि सध्याच्या आणि भविष्यातील ऊर्जेच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी महत्वाचे आहेत. दोन्ही नेत्यांमध्ये आज होणारया द्विपक्षीय वाटाघाटींमध्ये ऊर्जा, तेल आणि वायू, महत्त्वपूर्ण खनिजे, दुर्मिळ पृथ्वी तत्व आणि

डिजिटल पायाभूत सुविधा यासारख्या प्रमुख क्षेत्रांमधील सहकार वाढविण्या बरोबरच ,आरोग्याचा सुविधांचा व्याप वाढविण्या वरही चर्चा होईल. विशेषतः स्वस्त दरातील औषधे आणि पारंपारिक भारतीय आरोग्य उपायांची उपलब्धता वाढविण्यावर आणि नामिबियामध्ये जन औषधी सारखी योजना सुरू करण्या बद्दलही विचार विमर्श केला . भारताची यु पी आई प्रणाली लवकरात लवकर नामिबिया मध्ये लागू करण्या बाबत पण दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा होईल. पंतप्रधानांच्या भेटीमुळे दोन्ही देशातील व्यावसायिक संबंध वाढतील तसेच नामिबियाच्या प्रमुख क्षेत्रांमध्ये भारतीय गुंतवणुकीसाठी नवीन मार्ग मोकळे होण्याची अपेक्षा आहे. अपर्णा खुंट आकाशवाणी बातम्या विंडहोक.

भूषणगवई

घटना दुरुस्ती करून राज्य घटनेच्या मूळ गाभ्याला धक्का लावता येत नाही असं प्रतिपादन सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी काल मुंबईत केलं .न्यायमूर्ती गवई यांचा काल विधानभवनात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. युद्ध आणि संकटाच्या काळात भारतीय राज्य घटनेनं देशाला जोडून ठेवलं, असं गवई यांनी यावेळी सांगितलं. घटनेची मूलभूत तत्वं आणि मूलभूत अधिकार हे घटनेचा आत्मा असून या दोघांच्या एकत्रित विचारानं सामाजिक आणि आर्थिक न्यायासाठी काम केलं पाहिजे असं ते म्हणाले. यावेळी त्यांनी राज्य घटनेमागील डॉक्टर आंबेडकर यांची भूमिका उपस्थितांना समजावून सांगितली.

व्यापक जनहितासाठी गवई यांनी कायद्याचा वापर केला असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. प्रथमच सरन्यायाधीशांचा सत्कार विधान भवनात होत असल्याची प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी दिली तर हा सत्कार ऐतिहासिक असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. हा सत्कार म्हणजे राज्यातल्या जनतेचा आशीर्वाद असल्याची प्रतिक्रिया सत्काराला उत्तर देताना न्यायमूर्ती गवई यांनी व्यक्त केली.

दिल्लीमंत्रि

दिल्ली सरकारनं दिल्लीतल्या शाळांमध्ये स्मार्ट वर्गखोल्यांसाठी 900 कोटी रुपयांहून अधिक रक्कम मंजूर केली आहे. तसंच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 लागू करण्यालाही मंजुरी दिली आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत काल हे निर्णय घेण्यात आले. दिल्लीचे शिक्षण मंत्री आशिष सूद यांनी यावेळी डिजिटल वर्गखोल्यांच्या विस्तारीकरणाची योजना जाहीर केली. मंत्रिमंडळानं 9 वी ते 12 वीच्या वर्गांसाठी 18 हजार 966 अतिरिक्त स्मार्ट वर्गखोल्या तयार करण्याच्या प्रस्तावांना मान्यता दिल्यानं 2029-30 पर्यंत स्मार्ट वर्गखोल्यांची एकंदर संख्या 21 हजार पेक्षा जास्त होईल.

राष्ट्रीय राजधानी विकसित, स्वच्छ आणि सुरक्षित करण्यासाठी महत्वाच्या निर्णयांवर यावेळी चर्चा झालयाची माहिती कॅबिनेट मंत्री मनजिंदर सिंह सिरसा यांनी दिली. हे केवळ धोरणांचं मूल्यमापन नसून, विकसित भारत- विकसित दिल्ली हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेनं उचललेलं पाऊल असल्याचं ते म्हणाले.

शिशु

शिशु आणि लहान मुलांसाठी उपयुक्त असलेल्या जगातल्या पहिल्या हिवताप विरोधी उपचार पद्धतीच्या वापराला मान्यता देण्यात आली आहे. नोवार्टिस या औषध निर्मिती कंपनीला कॉर्टेम या हिवतापावरील नवीन औषधासाठी स्विट्जरलँड प्रशासनानं मंजूरी दिली आहे. मलेरियाशी संबंधित अधिकांश मृत्यू 5 वर्षाखालील मुलांमध्ये होतात.त्यामुळे हे औषध विकसित होणं अत्यंत महत्त्वाचं मानलं जात आहे. हिवतापाच्या उपचारासाठी आतापर्यंत तान्हया बाळांना मोठ्या मुलांसाठीचं औषध दिलं जात होतं, ज्यामुळे त्यांना अनेक धोके संभवत होते. येत्या काही आठवड्यात आफ्रिकेत नवीन औषधाचं उत्पादन आणि वितरण सुरू होण्याची शक्यता आहे.

सीता रामन

निष्क्रीय असलेली प्रधानमंत्री जनधन बँक खाती बंद करण्याचे कोणतेही निर्देश बँकांना दिलेले नाहीत, असं केंद्रीय अर्थमंत्रालयानं काल  स्पष्ट केलं. वित्तीय सेवा विभागानं अशी खाती बंद करायला सांगितल्याचं वृत्त माध्यमांमधून प्रसारित झाल्यानंतर मंत्रालयानं हे स्पष्टीकरण दिलं आहे. निष्क्रीय जनधन खात्यांच्या संख्येवर मंत्रालयाची देखरेख असून संबंधित खातेदारांशी संपर्क साधून त्यांची खाती कार्यरत ठेवण्याचा सल्ला वेळोवेळी देण्यात येत असल्याचंही मंत्रालयाने म्हटलं आहे.

करार

बंदरं आणि लॉजिस्टिक क्षेत्राला कुशल मनुष्यबळ पुरविण्यासाठी कौशल्य विकास विभाग, बंदरे विभाग आणि अटल सोल्युशन यांच्या दरम्यान काल एक सामंजस्य करार करण्यात आला. त्यानुसार नेदरलँड्स, डेन्मार्क आणि पोलंडमधील पतसंस्था १२० कोटी रूपयांची गुंतवणूक महाराष्ट्रात करणार आहेत. याअंतर्गत पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, बारामती, सिंधुदुर्ग, नागपूर आणि नाशिकमधील सहा निवडक ‘आयटीआय’ संस्थाचं  आधुनिकीकरण करण्यात येणार असल्याचं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या करारप्रसंगी बोलताना सांगितलं.

पुरबळीटेक्सास

अमेरिकेतल्या टेक्सासमध्ये पूरबळींची संख्या १०४ वर पोहोचली आहे तर ४१ जण बेपत्ता आहेत. बेपत्ता नागरिकांचा शोध घेण्यासाठी मोहीम सुरू असून ही आकडेवारी सातत्यानं बदलत आहे. केर कौंटी इथं सर्वाधिक जीवितहानी झाली आहे. इथं नदी किनारी असलेल्या मुलींच्या शिबिरातील अनेक बालकांचा मृत्यू झाला असून अनेकजण बेपत्ता आहेत.

आंदोलन

केनियात करण्यात आलेली करवाढ आणि त्यामुळे उडालेला महागाईचा भडका यामुळे सध्या आंदोलन सुरू आहे. काल सुरक्षा दलं आणि आंदोलनकर्त्यामध्ये झालेल्या झटापटीत दहाजण मारले गेले तर एकोणतीस जण जखमी झाले आहेत. या आंदोलनाचं लोण सतरा परगण्यात पसरलं होतं. दोन जणांच्या अपहरणानंतर पोलिसांनी सदतीस जणांना ताब्यात घेतलं आहे.

**नेमबाजी**

**स्पेन मधल्या माद्रिद इथं झालेल्या नेमबाजी विश्व चषक स्पर्धेच्या चौथ्या आणि शेवटच्या टप्प्यात भारताच्या ऋषभ यादव आणि ज्योति सुरेखा वेन्नम यांच्या कामगिरीनं भारताला पहिलं स्थान मिळवून दिलं. बावीस वर्षीय ऋषभ यादवनं पुरुषांच्या संयुक्त पात्रता फेरीत 716 गुणांसह सर्वोच्च स्थान मिळवलं. तर आशियाई खेळांची सध्याची विजेती ज्योती सुरेखा वेन्नमनं महिलांच्या संयुक्त विभागात 715 गुणांसह सर्वोच्च स्थान मिळवलं.**

**महाराष्ट्रपाऊस**

**महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांमध्ये सध्या मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळं सामान्य जनजीवन विस्कळीत झालं आहे. धरणातून होणारा पाण्याचा विसर्ग टप्प्याटप्प्यानं वाढवण्यात येणार आहे. त्यामुळं नदीकाठवरच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. भंडारा जिल्ह्यात कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळं पुराची शक्यता लक्षात घेत १८ रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. सांगली जिल्ह्यात वारणा आणि कोयना धरणातून पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणच्या समुद्रात मासेमारीसाठी गेलेली लहान नौका उलटून तीन मासेमार पाण्यात फेकले गेले. यातील दोघेजण बचावले आहेत. बेपत्ता मासेमाराचा शोध सुरू आहे.**

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार